# : योजनेबाबत मार्गदर्शक सूचना :

❖ **संजय गांधी निराधार योजने करीता अर्ज कोणाकडे करावा ?**

अर्जदाराने तो राहात असलेल्या भागातील संबंधित तलाठीकडे किंवा नायब तहसिलदार (सं.गा.यो.) यांचे कडे अर्ज करावा.

❖ **संजय गांधी निराधार अनुदान योजनेकरीता कोणकोणती कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.**

१. **वयाचा पुरावा.** २. **उत्पन्नाचा दाखला** ३. **रहिवाशी दाखला** ४. **अपंगाचे प्रमाणपत्र** (अपंगाकरीता)

५. **असमर्थतेचा / रोगाचा दाखला** (आजारी व्यक्तिकरीता)

६. **शासन अनुदानित निवासगृहाचा आंतरवासी नसल्याबाबतचा दाखला** (अनाथ व मुले करीता)

७. **अनाथ असल्याचा दाखला** (ग्रामसेवक/मुख्याधिकारी यांनी दिलेला व गटविकास अधिकारी/प्रकल्प अधिकारी एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी सांक्षाकित केलेला दाखला.)

❖ **संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत किती रुपये प्रतिमाह अनुदान मिळते ?**

या योजनेत प्रतिमाह लाभार्थ्यास रु. ६००/- इतके अनुदान मिळते.

❖ **कुंटुंबातएकापेक्षा अधिक लाभार्थी असल्यास किती अनुदान मिळते ?**

कुंटुंबात एकापेक्षा अधिक लाभार्थी असल्यास प्रतिमाह प्रति कुंटुंब रु. ९००/- इतके अनुदान मिळते.

❖ **संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी पात्रतेकरीता कुंटुंबाची उत्पन्न मर्यादा किती असते ?**

संजय गांधी निराधार योजने अंतर्गत पात्रतेकरीता कुंटुंबाची उत्पन्न मर्यादा रु. २१,०००/- आहे.

❖ **संजय गांधी निराधार योजनेचे पात्रतेकरीता वयोमर्यादा काय आहेत ?**

संजय गांधी निराधार योजनेची पात्रतेकरीता वय ६५ वर्षापेक्षा कमी असावे.

❖ **शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित मासिक आर्थिक लाभ घेत असलेली व्यक्ती विशेष सहाय्य योजनेखाली लाभ घेण्यास पात्र राहजे काय ?**

नाही

❖ **मुलांचे वय २५ वर्षापेक्षा अधिक असल्यास संजय गांधी निराधार अनुदान योजनेचा लाभ मिळतो काय ?**

१. लाभार्थ्याची मुले (मुलगा) २५ वर्षाची होईपर्यत किंवा नौकरी मिळेपर्यत (शासकिय/निमशासकीय/खाजगी) यामध्ये जे अगोदर घडेल तो पर्यंत लाभार्थी व मुलांना लाभ देण्यात येतो.

२. मुलाला नौकरी मिळाल्यानंतर (शासकीय/निमशासकीय/खाजगी) मुलांचे व कुटुंबाचे उत्पन्न विचारात घेवून लाभार्थ्याची पात्रता ठरविण्यात येते.

३. ज्यालाभार्थ्यांना फक्त मुलीच असतील, अशा लाभार्थ्यांच्या बाबतीत मुलीचे वय २५ झाले अथवा त्यांना नौकरी लागली किंवा त्यांचे लग्न होवून नांदावयास गेल्यास तरीसुध्दा लाभ चालू ठेवण्यात येतो.

❖ **कोणकोणत्या प्रकारच्या अपंत्वाला संजय गांधी निराधार अनुदान योजना मध्ये लाभ मिळतो ?**

अपंगातील अस्थिव्यंग, अंध, मुकबधिर, कर्णबधिर, मतिमंद, इ, प्रवर्गातील स्त्री व पुरुष सदर योजनेकरीता अर्ज करु शकतात.

❖ **आजाराचे कोणते प्रवर्ग संजय गांधी योजने मध्ये अर्ज करु करण्यास पात्र आहेत.**

क्षयरोग, पक्षघात, प्रमस्तीष्कघात, कर्करोग, एड्स, (HIV+VE) कुष्टरोग, सिकलसेल आणि सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेले दुर्धर आजार

❖ **आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्ती सदर योजनेकरीता पात्र ठरु शकते काय ?**

आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न प्रतिवर्षी रु. २१,०००/- पेक्षा कमी असल्यास ते कुटुंब या योजनेकरीता पात्र ठरतात.

❖ **अनाथ मुले संजय गांधी योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत काय ?**

१. १८ वर्षाखालील अनाथ मुले

२. शासकीय/निमशासकिय/शासन अनुदानित अनाथ आश्रमात न राहणारे मुले मुली हयांना संजय गांधी योजनेचा लाभ मिळू शकतो.

❖ **घटस्फोटीत महिलांकरीता पात्रतेचे निकर्ष काय आहेत ?**

अ) घटस्फोटीत प्रक्रियेतील स्त्रिया, ज्या पती-पत्नीने कायदेशिर घटस्फोट मिळण्यासाठी न्यायाकडे अर्ज केला आहे, परंतु घटस्फोट मिळण्याची अंतीम कार्यवाही झालेली नाही, अशा कालावधीत पतीपासून वेगळया राहणाऱ्या स्त्रियानी घटस्फोट मिळण्यासाठी न्यायालयाकडे केलेल्या अर्जाची सत्यप्रत व पतीपासून वेगळी राहत असल्याबाबतचे संबधित गावच्या तलाठी व ग्रामसेवक यांनी संयुक्तरित्या दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच शहरी भागासाठी तलाठी किंवा नगर पालीका / महानगरपालीकांचे कर निरीक्षक यांनी दिलेले प्रमाणपत्र आवश्यक राहील.

ब) घटस्फोट झालेल्या परंतू पोटगी न मिळणाऱ्या किंवा योजनेत विहीत केलेल्या उत्पन्न मर्यादेपेक्षा कमी पोटगी मिळणाऱ्या महिला अनुदान मिळण्यास पात्र राहतील. घटस्फोट झाल्याबाबत न्यायालयाच्या निणर्याची प्रत व पोटगीची रक्कम याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

क) परित्यक्त्या स्त्रियांच्या बाबतीत ज्या स्त्रीला एक वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून सोडले आहे किंवा तिला पती नांदवत नाही व त्यामुळे अशा स्त्रीला स्वतंत्रपणे किंवा नातेवाईकाकडे राहावे लागते, अशा स्त्रिया पात्र असतील. याबाबत तलाठी व ग्रामसेवक यांचा संयुक्त दाखला आवश्यक राहील. शहरी भागामध्ये तलाठी व नगरपालीकांचे /महानगरपालीकांचे कर निरीक्षक यांनी दिलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.

❖ **संजय गांधी योजनाचे लाभार्थी ६५ वर्षापेक्षा अधिक वयोमानाचे झाल्यास त्यांचे अनुदान बंद होईल काय ?**

नाही. सदर लाभार्थ्यांस पात्रतेच्या निकर्षाला अधिन राहून श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतून मासिक अनुदान मिळू शकते.